सकाळ

• पुणे, गुरुवार, १९ सप्टेंबर २०१९

» अवतीभवती

## सिटी इंटरनॅशनल स्कूलला पुरस्कार



**पुणे : पुणे लिडरशिप कॉन्फरन्स तर्फे आयोजित परिषदेमध्ये सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांना पुरस्कार मिळाला.**

**सहकारनगर :** पुणे लिडरशिप कॉन्फरन्स तर्फे घेण्यात आलेल्या परिषदेमध्ये सातारा रस्त्यावरील सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांनी चमक दाखवून मॉडेल युनायटेड नेशन्सचा पुरस्कार पटकाविला. सिम्बायोसिस स्कूल ऑफ लिबरल आर्टस येथे झालेल्या या परिषदेत 'सिटी इंटरनॅशनल'मधील सातवी ते दहावीतील १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या चर्चासत्रात जागतिक शांततेसाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांविषयीचे विचार विद्यार्थ्यांनी मांडले. विद्यार्थ्यांना सार्वजनिक ठिकाणी बोलता यावे, वादविवाद करता यावा, त्यांच्यातील नेतृत्वगुण सर्वांसमोर यावेत, हा या परिषदेचा उद्देश होता. सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि बाह्य जगाचा शांततेमय मार्गाने वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले.